


# ग्रंथ पुरस्कार : ललित

मनोगत

## मंगेश नारायणराव काळे

१९९० नंतरच्या काळात पुढे आलेल्या आणि या काळाची कविता लिहिणाऱ्या मंगेश नारायणराव काळे यांचा 'तृतीय पुरुषाचे आगमन' हा चौथा काव्यसंग्रह आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमुळे आणि उदारीकरणाच्या प्रभावामुळे सामान्य माणसाची जी संभ्रमित व दिशाहीन अवस्था झाली आहे त्या अवस्थेचे भिन्नस्वरूपी दर्शन घडविणारी 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही शंभर पानांची दीर्घ कविता आहे. भाषेचे विविध पदर, तिच्या शक्यता, पुराणे, दंतकथा, दृष्टांत, इतिहास यांचा नवा अन्वयार्थ हा या कवितेचा विशेष आहे. यामध्ये भूत- भविष्य- वर्तमानाचे प्रतिबिंब उमटलेले असून मानवी हिंसा, वासना, क्रौर्य यांचे ती दर्शन घडविते आणि या भयावह वास्तवाच्या आरशात पाहायला भाग पाडते.
या कवितेतील वैचारिक द्रव्य भावनिक आवाहनातून व नाट्यात्म आविष्कारातून प्रकटले आहे. विचारांची मांडणी करण्यासाठी कवितेचा उपयोग करण्याची परंपरा मराठीत मध्ययुगीन काळापासून चालत राहिली आहे... कवी मंगेश नारायणराव काळे म्हणतात, 'प्रश्नांच्या शोधात असतानाच ही कविता लिहून झाली आहे.'...

# कविता प्रश्न विचारते... सतत विचारत राहते

**आपण जगभरातला कवितेचा इतिहास तपासून पाहिला तर दिसून येईल की कवितेने नेहमीच पहिल्यांदा 'ब्र' उच्चारला आहे. तुम्ही ॲक्टिव्हीस्ट असाल तर रस्त्यावर उतराल. मी अगोदर कवी असल्याने माझा प्रतिरोध माझ्या कवितेतून व्यक्त झाला. 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही दीर्घ कविता याच प्रोटेस्टमधून आली. अर्थात एखाद्या कवितेने समाज जागा व्हावा अशी परिस्थिती आजही नाही. तरीही आपापल्या परीने प्रयत्न तर करावेच लागतील. नाहीतरी सामाजिक वास्तवाचे जास्तीत-जास्त भान कवी, लेखक, कलावंतानाच ठेवावे लागत असते. याच वास्तवातून कवी प्रेरीत होत असतो. अर्थात हे सगळे मी माझ्यापुरते म्हणतोय. असा कोणताही आग्रह सगळ्याच कवी-लेखकांवर लादणे योग्य होणार नाही.**

१.

कवीने जे काही बोलायचे असते, ते कवितेतूनच बोलले पाहिजे किंवा कविताच कवीचं वक्तव्य असते, अशी माझी धारणा असल्याने स्वत:च्या कवितेविषयी काही एक सांगण्यापेक्षा तिच्या भवतालाविषयी, पर्यावरणाविषयी आणि झालेच तर निर्मितीसंबंधातले दोन शब्द असे काहीसे स्वरूप या मनोगताचे असेल.

एक कवी, वाचक, आणि एका वाङ्‌मयीन अनियतकालिकाचा संपादक म्हणून गेल्या २५ वर्षांत मराठी कवितेशी असलेला संबंध, आणि माझ्या वकुबानुसार इतर भारतीय व पाश्चात्य कवितेशी अनुवादातून वा थेट झालेला परिचय चांगल्या, महत्त्वाच्या कवितेची काही एक व्याख्या निश्चित करण्यासाठी सहायक राहिला आहे.

ज्या कालखंडात मी कविता लिहू लागलो किंवा आजवर लिहितो आहे, त्या काळात समोर असलेली कविता आणि गेल्या ७००-८०० वर्षांतील मराठी कवितेची परंपरा या सगळ्यांतूनच मला माझ्या पूर्वसूरी आणि समकालीन कवितेचा शोध घेता आला; स्वत:च्या कवितेचा शोध घेता आला. मात्र हा एक दमछाक करणारा अनुभव होता. दमछाक एवढ्याचसाठी की आजवर चांगली, महत्त्वाची कविता ही नेहमीच अत्यल्प स्वरूपाची, दुर्लक्षित आणि व्यवस्थेच्या बाहेर राहिली आहे. त्यामुळे व्यवस्थेने ठळक केलेल्या, कृतक, तत्कालीन कवितेतून चांगल्या कवितेचा शोध ही दमवणारी गोष्ट होती.

माझ्यासाठी कवितेची परंपरा तिची वळणे, विस्तार, खंडन हा नेहमीच कुतूहलाचा विषय राहिल्याने प्रसंगी ही परंपरा मी स्वीकारली तर कधी पूर्वसुरींच्या कवितेला नाकारण्याची जोखीमही पत्करली आहे. माझी अशी धारणा आहे की समृद्ध कवितेची परंपरा स्वीकारणारा कोणताही कवी जसा आपल्या परंपरेकडे सश्रद्ध पहात असतो तसा वेळप्रसंगी तो या परंपरेतील कालबाह्य झालेले, जुने झालेले नाकारतही असतो. शिवाय कृतक, हातचलाखीतले, व्यवस्थेने लादलेले, उभे केलेले वळण यांपासून दूरही राहत असतो.

२.

कवितेचे आपल्या समाजात काय स्थान आहे? कवितेची सामाजिक उपयुक्तता काय आहे? अकरा कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रात कवितेचा व्यवहार एक हजार किंवा अजून शे-पाचशे जास्त लोकांपुरताच का मर्यादित असतो? त्यामुळे या सगळ्यांत कवितेची अपरिहार्यता, गरज, महत्त्व ठरवणे धाडसाचे ठरेल. जागतिकीकरणाच्या कालखंडात माणसाचे वस्तूत रूपांतरण होत असताना तर हा प्रश्न अधिकच

कळीचा ठरतो. असे असले तरी मानववंशाचा इतिहास मात्र कवितेच्या बाजूने उभा असल्याचे दिसून येते. जगाच्या इतिहासात कवितेचे स्वत:चे एक स्थान नेहमीच अबाधित राहिले आहे. मग भलेही कवितेचा व्यवहार हा मूठभर लोकांपर्यंत मर्यादित राहिला असेल.

माझ्यासमोरचा प्रश्न हा आहे, की आज आपण माध्यम क्रांतीच्या काळात वावरत असतांना, भाषा स्खलन, भाषासंकर, भाषामृत्यू अशा घटितांमध्ये कवितेची अत्यल्प उपस्थिती कशी टिकवून ठेवायची? मराठी भाषेपुरते बोलायचे झाले, तर हे चित्र अधिकच विदारक आहे. हे कमी की काय, म्हणून गावोगावी कवितेचे जलसे करणाऱ्या, करमणुकीसाठी वाट्टेल त्या चेष्टा करणाऱ्या, थकलेल्या बाबांसाठी अंगाई म्हणणाऱ्या, गाणाऱ्या, रडणाऱ्या कवींच्या कवितांचे उत्पादन इतके वेगाने वाढले आहे की चांगल्या कवितेची क्षीण उपस्थितीही दिसेनाशी होते आहे. हे आजच घडते आहे असे नाही. पूर्वीही हे घडत होते, मात्र माध्यमांच्या मर्यादित अस्तित्वामुळे त्यांचा उपद्रव मर्यादित होता. आज माध्यमक्रांतीमुळे हा धुडगूस मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. नियतकालिके, दिवाळी अंक, वृत्तपत्रांच्या पुरवण्या, अभ्यासक्रम, बक्षिसे, कवी-संमेलन, टी.व्ही. चॅनेल्स, आकाशवाणी, फेसबुक, ट्वीटर, आर्कुट असा हा धुडगुस सुखेनैव सुरू आहे. मनोरंजन आणि खप हा एकमेव निकष आणि थिल्लर माध्यमे हे निवडकर्त्यांच्या भूमिकेत शिरल्याने तर ही सुमार उत्पादने भरात आहेत. या पार्श्वभूमीवर कवितेचा अन् पर्यायाने भाषेचाही विचार करण्याची गरज आहे.

३.

नव्वदोत्तर कालखंड हा वळणाचा कालखंड होता. आज नव्वदोत्तर दोन दशके उलटून गेल्यावर बदललेले पर्यावरण आपल्यासमोर आहे. काही नवे प्रश्न, समस्याही समोर आहेत. भाषावाद, प्रांतवाद, बोली-भाषांचे अपमृत्यू, इंग्रजीचे वाढते आक्रमण, संस्कृती-भाषा-संकर असे काही प्रश्न ऐरणीवर आहेत. हे प्रश्न भाषा, संस्कृतीपुरते मर्यादित राहिले नसून धर्म, राजकारण, सत्ता-संघर्षाची सावली त्यावर पडलेली आहे. भाषावार माणसांची विभागणी, दुसऱ्या भाषेचा द्वेष, प्रांतवार माणसांची विभागणी, यांमुळे आपण आपल्या देशातच एकमेकांपासून दूर जातोय. एकीकडे जागतिकीकरणामुळे जगाचे एका खेड्यात रूपांतरण होत असल्याचे म्हणत असताना हा दुरावा नजरेत भरणारा आहे. त्यामुळे आपले आजचे वर्तमान कधी नव्हे तेवढे भयावह झाले आहे. दुस्वप्नवत वाटाव्या अशा घटना आपल्या डोळ्यांसमोर बिनदिक्कत घडतात. आपण गावात, रस्त्यावर किंवा टी.व्ही.च्या पडद्यासमोर बसून त्या निमूटपणे पहात असतो. मात्र अशा पर्यावरणात किमान कवी-लेखक मूग गिळून राहू शकणार नाही. आपण कसे जगावे, मरावे, कोणती भाषा बोलावी, कोणत्या प्रदेशात रहावे हे ठरविण्याचा अधिकार इतरांना नसेल. आपल्या अधिकारावर गदा आणणाऱ्या शक्तींविरुद्ध बोलावेच लागेल. ते काम लिहित्या हातांनाच करावे लागेल. कवी स्वत:साठी बोलतो; तसाच तो आपल्या समाजासाठीही बोलतच असतो. याचा अर्थ असा नाही, की कवी-लेखक हा समाजाचा प्रवक्ता आहे किंवा तो इतर लोकांपेक्षा काही एक विशेष आहे. तो सर्वसामान्यच आहे. मात्र आपल्या आवाजात- मग तो क्षीण का असेना, तो बोलतो आणि माझी धारणा आहे, की हा आवाज निश्चितच सांप्रत इतर आवाजांपेक्षा अधिक प्रामाणिक आणि स्पष्ट असतो. हे वर्तमान इतके गुंतागुंतीचे झाले आहे की एक कवी म्हणूनच नाही, तर एक माणूस म्हणूनही तुम्ही या सगळ्यापासून दूर राहू शकत नाही. तुमची कविताही नाही. तुम्हांला तुमचा प्रतिरोध उभा करावाच लागेल, हे अपरिहार्य आहे; अगदी अगतिकतेतून आलेले

**'तृतीय पुरुषाचे आगमन' या कवितेतला**
**तृतीय पुरुषही मला माझ्या वर्तमानातच भेटला.**
**सातत्याने भेटत गेला. त्याच्या अस्तित्वाची**
**चीड यावी, घृणा वाटावी इतके त्याचे चरित्र**
**भयावह होते, आहे. तरीही एका मोठ्या**
**जनसमुदायाला तो आपला वाटावा?**
**हवाहवासा वाटावा? स्वत:हून गुलामीचे जोखड**
**गळ्यात घालून वावरणारी मास टेन्डसी**
**थक्क करायला लावणारी होती-आहे.**
**हे असे का घडते? संमोहन झाल्यासारखी**
**माणसे मोठ्या समूहाने अशा चरित्रांच्या**
**आधीन कशी होतात, का होतात?**
**सत्तेच्या केंद्रस्थानी नेहमीच दुय्यम,**
**तिय्यम दर्जाची माणसेच का राहतात?**
**अशा प्रश्नांच्या शोधात असतांनाच**
**ही कविता लिहून झाली .**

असले तरी. आपण जगभरातला कवितेचा इतिहास तपासून पाहिला तर दिसून येईल की कवितेने नेहमीच पहिल्यांदा 'ब्र' उच्चारला आहे. तुम्ही ॲक्टिव्हीस्ट असाल तर रस्त्यावर उतराल. मी अगोदर कवी असल्याने माझा प्रतिरोध माझ्या कवितेतून व्यक्त झाला. 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही दीर्घ कविता याच प्रोटेस्टमधून आली. अर्थात एखाद्या कवितेने समाज जागा व्हावा अशी परिस्थिती आजही नाही. तरीही आपापल्या परीने प्रयत्न तर करावेच लागतील. नाहीतरी सामाजिक वास्तवाचे जास्तीत-जास्त भान कवी, लेखक, कलावंतानाच ठेवावे लागत असते. याच वास्तवातून कवी प्रेरीत होत असतो.

४.

'तृतीय पुरुषाचे आगमन' ही जवळ-जवळ १०० पानांची दीर्घ कविता आहे. या कवितेचे दीर्घत्व ही त्या कवितेची नीड होती. नाहीतरी प्रत्येक कविता आपला आकार, रूप, शरीर, आशय घेऊनच जन्माला येत असते. (राहिला प्रश्न तिच्या वाङ्मयीन अस्तित्वाचा, तर तो प्रश्न कवीच्या अखत्यारीतला नसतो.) प्रत्येक कवी आपापल्या वकुबानुसार भाषेच्या जास्त-जास्त शक्यता पणाला लावत असतो. भाषेतल्या लयी, अंगभूत सौंदर्य, नवे संस्कार, विस्मरणात गेलेले शब्द, शब्दकळा पुन्हा नव्याने मांडत असतो; काळ हा कवीसाठी महत्त्वाचा एलिमेन्ट असल्याने भूत, भविष्य, वर्तमानाच्या सरमिसळीतून तो आपले काव्यसंचित शोधत असतो. कवीसाठी काळाचे हे तिन्ही तुकडे एकरेषीय असतात, यातूनच त्याचे वास्तव ठळक होते. महत्त्वाचे म्हणजे आपले हे वास्तव तो कल्पिताच्या अंगाने मांडतो. वास्तव आणि कल्पिताच्या द्वैतातूनच तो आपल्या पूर्वसुरींच्या पुढचा प्रांत धुंडाळत असतो.

'तृतीय पुरुषाचे आगमन' या कवितेतला तृतीय पुरुषही मला माझ्या वर्तमानातच भेटला. सातत्याने भेटत गेला. त्याच्या अस्तित्वाची चीड यावी, घृणा वाटावी इतके त्याचे चरित्र भयावह होते, आहे. तरीही एका मोठ्या जनसमुदायाला तो आपला वाटावा? हवाहवासा वाटावा? स्वत:हून गुलामीचे जोखड गळ्यात घालून वावरणारी मास टेन्डसी थक्क करायला लावणारी होती-आहे. हे असे का घडते? संमोहन झाल्यासारखी माणसे मोठ्या समूहाने अशा चरित्रांच्या आधीन कशी होतात, का होतात? सत्तेच्या केंद्रस्थानी नेहमीच दुय्यम, तिय्यम दर्जाची माणसेच का राहतात? अशा प्रश्नांच्या शोधात असतांनाच ही कविता लिहून झाली आणि हे केवळ आजच घडत नाही किंवा आपला वर्तमानच या तृतीयपुरुषाने झाकोळलाय असे नाही तर मानववंशाचा इतिहास, पुराणे, मिथके असा सर्वत्र या तृतीय पुरुषाचा वावर होता, हे तपासून पहाता येते. अर्थात त्यासाठी इतिहासाकडे कुतूहलानं, प्रसंगी संशयाने पाहण्याची सवयही कवी-लेखकांनी लावून घेतली पाहिजे, कारण इतिहास लिहिणारे हात नेहमीच संशयास्पद असतात. आपल्या सोयीचा इतिहास त्यांनी लिहिलेला असतो. एक कवी म्हणून माझ्या वकुबानुसार तो शोध घेण्याचा प्रयत्न मी केला. माझ्यासाठी हा विषयच इतका त्रासदायक होता की या १०० पानांतूनही ते पूर्णपणे व्यक्त झाले असे मला वाटत नाही. माझ्यासाठी अजूनही ही कविता अपूर्णच आहे. कदाचित एक कवी म्हणून ती माझी मर्यादा असेल किंवा त्या काळापुरते सांगून झाल्याचा विराम. नाहीतरी कवितेचे काम पूर्णत्वाला जाण्याचे, कोणतेही उत्तर देण्याचे, शोधण्याचे नसते. ती प्रश्न निर्माण करते, विचारते, सतत विचारत राहते. स्वत:च्या अस्तित्वाकडेही संशयाने पहाते. आपल्या भवतालाविषयी जागरूक असणे हा कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे.

५.

''मैने अपनी कविता के इस चरण तक पहुँचते-पहुँचते शैली मे ताल और गती के कुछ प्रयोग किये है। ताल को साधारण बोलचाल की ताल जैसा बनाने में कुछ कविताओं में... सफलता मिली है।... भाषा को भी साधारण बोलचाल की भाषा के निकट लाने की कोशिश रही है, मगर उसमें भी कहीं-कहीं भाषा की फिजूल खर्ची करनी पडी है। बहरलाल इस तरह की कोशिशें विचारवस्तु के दिल और दिमाग में उतरने के तरीकेपर निर्भर रहेंगी और जरुरी है की हम अपनी अनुभूति को उसी प्रकार सुधारें, ताकि कविता भी वैसी ही जानदार हो सके जैसी की वे वास्तविकता है, जिनसे हम कविता की प्रेरणा लेते है। विचारवस्तु का कविता में खून की तरह दौडते रहना कविता को जीवन और शक्ती देता है, और यह तभी सम्भव है जब हमारी कविता की जडें यथार्थ में हो।'' **- रघुवीर सहाय**

रघुवीर सहाय यांनी 'दुसरा सप्तक' (१९५१), मध्ये स्वत:च्या कवितेविषयी केलेले वक्तव्य मी इथे उद्धृत केले आहे. माझ्या कवितेविषयी मी यापेक्षा अजून काय वेगळे म्हणू शकलो असतो?

**मंगेश नारायणराव काळे**
१५ बी, आनंदमयी अपार्टमेंट, हॉटेल वरुणराज शेजारी,
एरंवडणा, कर्वे रोड, पुणे ४११००४.
मोबा. ९७६६९९४१५४
mangeshnarayanrao@gmail.com

ओळख

**विलास खोले**

# स्थित्यंतराच्या भयाची मीमांसा करणारी कविता




मंगेश नारायणराव काळे (जन्म १७ जानेवारी १९६६) हे औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा लेण्याजवळच्या सोयगावचे. जळगाव येथून पुणे विद्यापीठाची हिंदी विषयातील एम. ए. ही पदवी संपादन केल्यानंतर तत्कालीन मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर शिक्षण घेतले. गेली पंचवीस वर्षे कविता लिहीत असलेल्या मंगेश नारायणराव काळे यांचे 'मंगेश नारायणराव काळेची कविता' (२००१, दु. आ. २००५), 'शक्तिपाताचे सूत्र' (२००४), 'नाळ तुटल्या प्रथम पुरुषाचे दृष्टांत' (२००७) असे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'शक्तिपाताचे सूत्र' या त्यांच्या संग्रहाला 'यशवंतराव चव्हाण कऱ्हाड पुरस्कार' हा प्रतिष्ठेचा सन्मान लाभला आहे. त्यांची 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही दीर्घ कविता २०१० मध्ये प्रसिद्ध झाली. २०१०-२०११ या वर्षासाठी त्यांना 'इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट' या बंगळुरू येथील संस्थेकडून 'मराठी वाङ्मयीन नियतकालिके : परंपरा आणि प्रवाह' या विषयावर संशोधन करण्यासाठी तीन लक्ष रुपयांची फेलोशिप मिळाली. त्यांनी ते काम पूर्ण केले आहे. 'शब्दवेध' या नियतकालिकाच्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक असून, २००४ पासून ते 'खेळ' या नियतकालिकाची निर्मिती व संपादन करताहेत. त्यांना 'कविता हे व्यक्त होण्यासाठी सगळ्यांत जवळचे, विश्वसनीय माध्यम वाटते'. परंतु अभिव्यक्तीसाठी चित्र या माध्यमाचाही त्यांनी स्वीकार केला आहे. ते चित्रे काढतात आणि त्यांच्या चित्रांची दिल्ली व मुंबई येथे चारपाच प्रदर्शने भरली आहेत.

प्रस्तुत 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही दीर्घकविता हा मंगेश नारायणराव काळे यांच्या काव्यप्रतिभेचा नवा आविष्कार आहे. गेल्या दोन दशकांत मराठी कवितेने जे नवे रूप धारण केले आहे, त्या रूपाच्या जडणघडणीस कारणीभूत असणाऱ्या कवींपैकी महत्त्वाचे कवी म्हणून मंगेश नारायणराव काळे यांची कामगिरी लक्षणीय आहे. मुख्यत्वे जागतिकीकरणाच्या लाटेमुळे आणि उदारीकरणाच्या प्रभावामुळे सामान्य माणसाची जी संभ्रमित व दिशाहीन अवस्था झाली आहे त्या अवस्थेचे भिन्नस्वरूपी दर्शन त्यांच्या कवितेने घडविले आहे. जागतिकीकरणाचे पाठीराखे आणि विरोधक यांपैकी कोणालाच भविष्यात काय घडेल ते सांगता येत नाही. थॉमस फ्रीडमनच्या ग्रंथशीर्षकाप्रमाणे 'द वर्ल्ड इज फ्लॅट'. त्यामुळे परस्परांपासून दूर असणाऱ्यांमधले भौगोलिक अंतर जरी संपुष्टात आले असले, तरी त्याच वेळी जवळ असणाऱ्यांमध्ये मानसिक अंतर उत्पन्न झाले आहे. एकीकडे संवादाची साधने वाढली तरी प्रत्यक्षात मात्र विसंवादात भर पडली. कशाला चांगले म्हणायचे, कशाला वाईट?

प्रत्येक माणसाच्या जगण्याचे काही मूलभूत प्रश्न असतातच. त्या प्रश्नांत परंपरेचे-संस्कृतीचे ओझे आपली एक भर घालत असते. विकसित देशांतील बदलत्या जीवनरीतींचे आक्रमण इथल्या माणसाला द्विधाचित्त करते. समकालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीतून वर्तमानाला सामोरे जाताना त्याच्यापुढे नित्य नवे प्रश्न उद्‌भवत असतात. माणसाभोवतालच्या समाजजीवनात भ्रष्टाचार, व्यभिचार, अत्याचार असे सामान्य माणसाला घेरून टाकणारे व हतबल करणारे भस्मासूर सातत्याने भेडसावत असतात. त्याची मती कुंठित करून टाकणारी ही परिस्थिती त्याला विवेकभ्रष्ट करून टाकते. सदसद्विवेकबुद्धी लोप पावल्यामुळे माणूस दिसेल त्या वाटेने मार्गक्रमणा करतो. काही वेळा जीवनातल्या विभिन्न पेचांनी निरुत्तर करून टाकल्यामुळे तो आत्मघाताचाही पर्याय स्वीकारतो. भविष्यात आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे आणि आपल्या वाट्याला कोणत्या प्रकारची संकटे येणार आहेत, त्यांत आपला कसा निभाव लागणार आहे, या काळजीने पोखरल्या जाणाऱ्या जिवांची भ्रांत अवस्था मंगेश नारायणराव काळे आपल्या कवितांतून मांडत आले आहेत. सातत्याने प्रश्नांकित असणाऱ्या भयभीत माणसांचे दुबळेपण आणि एकंदर मानवी जगण्यातील बावरलेपण त्यांच्या कवितेने अधोरेखित केले आहे. त्यांच्या काव्यलेखनाने व्यापक नीतीचे विभिन्न प्रश्न उत्पन्न केले आहेत.

आता 'तृतीय पुरुषाचे आगमन' या कवितेविषयी. स्फुट कवितालेखन व दीर्घ कवितालेखन यांमध्ये दीर्घ कविता ही कवीचा विशेष कस पाहाणारी निर्मिती असते. एकाच केंद्रवर्ती आशयाच्या अनुषंगाने त्या आशयाची बहुविध अंगे आविष्कृत होतील अशा प्रकारे कविता लिहिणे हे जोखमीचे काम आहे. मुख्य विषयावर लक्ष केंद्रित करून त्यास पूरक व पोषक अशी काव्यरचना झाल्यावाचून दीर्घ कविता आकाराला येत नाही. भावनिक आवाहन टिकवून ठेवणे आणि काव्यानुभवातील उत्कटतेला झळ पोचू न देणे हे दीर्घ कवितेत साधावे लागते. निवेदनपरता, भावदर्शन, प्रसंगचित्रण, व्यक्तिमनाची वा समूहमनाची अभिव्यक्ती, नाट्यमयता यांसारखे दीर्घ कवितेचे आकारिक घटक एकवटून आल्याशिवाय ती कविता प्रभावी ठरू शकत नाही. मंगेश नारायणराव काळे यांच्या कवितेत भावप्रकटीकरणाइतकेच विचारप्रकटीकरणालाही महत्त्व असते. किंबहुना भावनांतून विचार की विचारांतून भावना, असा प्रश्न पडावा इतके भावना व विचार मंगेश काळे यांच्या कवितेत एकरूप झालेले आहेत. त्यातील वैचारिक द्रव्य भावानिक आवाहनातून व नाट्यात्म आविष्कारातून प्रकटले आहे. विचारांची मांडणी करण्यासाठी कवितेचा उपयोग करण्याची परंपरा मराठीमध्ये मध्ययुगीन काळापासून चालत आली आहे. आधुनिक काळात केशवसुत, मर्ढेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, अरुण कोलटकर, नारायण सुर्वे इत्यादिकांनी आपापल्या प्रतिभाधर्मानुसार कवितेच्या माध्यमातून विचारांची मांडणी केली आहे. मंगेश नारायणराव काळे यांची कविता हाच वसा आपल्या पद्धतीने पुढे चालवते आहे.

'तृतीय पुरुषाचे आगमन' मूर्त करण्यासाठी कथन व नाट्य यांचे मिश्ररूप कवीने स्वीकारले आहे. रामायण-महाभारतापासून, तुकारामांपासून नारायणराव पेशव्यांच्या हत्येपर्यंत व नवभांडवलशाहीच्या आक्रमणापर्यंत इतिहासातले अनेक संदर्भ देत 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही कविता सर्वग्रासी स्थित्यंतराच्या भयाची मीमांसा करते आहे.

**विचारांची मांडणी करण्यासाठी कवितेचा उपयोग करण्याची परंपरा मराठीमध्ये मध्ययुगीन काळापासून चालत आली आहे. आधुनिक काळात केशवसुत, मर्ढेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, अरुण कोलटकर, नारायण सुर्वे इत्यादिकांनी आपापल्या प्रतिभाधर्मानुसार कवितेच्या माध्यमातून विचारांची मांडणी केली आहे. मंगेश नारायणराव काळे यांची कविता हाच वसा आपल्या पद्धतीने पुढे चालवते आहे. 'तृतीय पुरुषाचे आगमन' मूर्त करण्यासाठी कथन व नाट्य यांचे मिश्ररूप कवीने स्वीकारले आहे. रामायण-महाभारतापासून, तुकारामांपासून नारायणराव पेशव्यांच्या हत्येपर्यंत व नवभांडवलशाहीच्या आक्रमणापर्यंत इतिहासातले अनेक संदर्भ देत 'तृतीय पुरुषाचे आगमन' ही कविता सर्वग्रासी स्थित्यंतराच्या भयाची मीमांसा करते आहे.**

कवितेतील निवेदक सांगतो त्याप्रमाणे तृतीय पुरुषाचे आगमन होणार याबाबत कोणतीही शंका नाही. 'तृतीय पुरुष' ही संज्ञा मराठीत व्याकरणिक वर्गवारीपासून लैंगिकतेच्या विशिष्टत्वापर्यंत योजली जाते. तृतीय पुरुष नेहमीच दूरत्व सूचित करतो. मग ते व्याकरणातले असो वा मानवी जीवनव्यवहारातले असो. दूरचा असल्यामुळे त्याचे अपरिचितपण व परकेपण स्वाभाविक होय. या परकेपणाची वेगवेगळी रूपे भूतकाळापासून वर्तमानापर्यंत व्यक्त झाली आहेत. कधी शिखंडीच्या रूपात, कधी बृहन्नडेच्या रूपात, कधी मलिक कफूरच्या रूपात, कधी गारद्याच्या वेषात, कधी नाझी रूपात या कवितेतील निवेदकाला तृतीय पुरुषाचे दर्शन घडले आहे. कृष्णकुलातील यादवी ही तृतीय पुरुषाचीच निर्मिती आहे. या वेगवेगळ्या रूपाविष्कारांचे दर्शन घडविण्यासाठी रंगमंच व वेगवेगळ्या प्रवेशांतून साकार होणारे नाट्य अशी रचना कवीने केली आहे. या रंगमंचाचे वैशिष्ट्य म्हणजे हा सगळ्यांसाठी खुला आहे. ''जात, धर्म, पंथ, वय, रंगरूप, लिंग असा भेदाभेद नाहीये कोणताही'' (पृ. ११) हे कवितेतील निवेदकाने जाहीर केले आहे. तृतीय पुरुषाने रंगमंचावर येऊ नये हा शतकानुशतकांचा संकेत त्याच्याकडूनच भंग पावणार आहे.

*ये धीरोदात्त तृतीय पुरुषा... ये ऽ ऽ*
*आम्ही स्वागत करतो तुझं बेंबीच्या देठापासून*
*पायघड्या तर कधीच्याच अंथरून ठेवल्याहेत*
*तुझ्या स्वागतासाठी आमच्या देहाच्या (पृ. २५)*

एवढेच पुरेसे नाही म्हणून की काय पुरुषांनी व स्त्रियांनी त्याला एकाच वेळी सांगितले की,

*तुझे तर नेहमीच स्वागत करत आलोय आम्ही पिढ्यांन्पिढ्यापासून / नि आमचे स्वातंत्र्य तर आधीच बहाल केले आहे तुला (पृ. ३१)*

त्याला आवाहन करताना त्याच्या प्रतीक्षेच्या काठावर अनावृत्त होऊन ताटकळत राहिलेल्या. स्त्रियांनी त्याची प्रार्थना केली आणि प्रार्थना करताना त्या म्हणाल्या, ''कुळाच्या कुलपुरुषा नांगर आमची जमीन ...आमच्या वीर्यदात्या ये ऽ ऽ चालव आपले घबाड ...आमच्या ब्रह्मणस्पती ये ऽ ऽ सांड तुझे बीज सर्वत्र/तुला आम्ही बोलवतोय'' (पृ. ३०)

तृतीय पुरुष केव्हा येणार ते अनिश्चित आहे. सारे प्रेक्षागार त्याच्या प्रतीक्षेत आहे. प्रतीक्षा ही नेहमीच क्लेशकारक असते. येथे तर प्रतीक्षेने धनुष्याच्या ताणलेल्या प्रत्यंचेप्रमाणे या कवितेतील भावनिक ताण निर्माण केला आहे. आणि कवितेला गतीही दिली आहे. ताणामुळे व गतीमुळे कविता वाचकाला झपाटून टाकते. तृतीय पुरुष येणार आहे; त्याचा चेहरा कसा असेल, त्याचा आवाज कसा असेल, कुठल्या रूपात तो येईल, तो कसा ओळखायचा, तो काय करील, त्याचे येणे जर अपरिहार्य आहे, तर मग त्या अपरिहार्यतेला सामोरे कसे जायचे या चिंतेची छाया सतत माणसांच्या जगण्यावर पडली आहे. तृतीय पुरुषाविषयीच्या अनामिक भयाने सर्वांना ग्रासले आहे, त्याचे येणे अशुभ आहे. हिंसेचे, क्रौर्याचे, अमानुषतेचे तो दुसरे रूप आहे. ''गेल्या काही दिवसांपासून अशुभाच्या येण्याचे संकेत दिसू लागले आहेत.'' (पृ. ११८) तो वेषांतरकुशल आहे. बटू वामन किंवा नृसिंह किंवा मत्स, कुर्म, वराह किंवा शक किंवा हूण किंवा अरब किंवा इराणी किंवा पारसी किंवा कुशाण यांसारखी बेमालूम वेषांतरे करून वेगवेगळ्या शतकांत यापूर्वी त्याचे आगमन झाले आहे. त्याच्या वेषांतराने आजवर माणसांना नेहमीच चकवले आहे. ''सगळ्या नाटकाचा ताबाच घेतलाय त्यानं नकळत सगळ्यांच्या/ नि नाटकाचा शेवटही बदलून टाकलाय त्यानं दिग्दर्शकाशिवाय.'' (पृ. १८)

कवितेतील निवेदकाने उपोद्घातात तृतीय पुरुषाचे गुणविशेष सांगून पुढील सात प्रवेशांत त्याचे होणारे आगमन वेगवेगळ्या रूपांत होणार असल्याची सूचना दिली आहे. पहिल्या प्रवेशात त्याचे स्वागत करताना त्याला उद्देशून धीरोदात्त, पराक्रमी, कृपाळू अशी गौरवपर विशेषणे योजली आहेत. स्वत्वलोप झालेल्या माणसांकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा कशी करणार? ज्यांना धैर्याचा इतिहास नाही आणि ज्यांचा वर्तमान फाटका आहे अशांनी तृतीय पुरुषाचे स्वागत करावे, त्याला आवाहन करावे, त्याची प्रार्थना करावी हेच स्वाभाविक आहे. दुर्बलतेचे, असहायतेचे, अगतिकतेचे, निमूट शरणागतीचे ते दर्शन आहे. ज्यांना स्वत:चा चेहराच उरला नाही, ज्यांना स्वत:चे व्यक्तित्व उरले नाही अशा सर्व मानवांसाठी तृतीय पुरुषाच्या आगमनप्रसंगी प्रत्येकी एकेक नवा मुखवटा देण्यात येणार आहे. 'हे मुखवटे सदैव हसरे नि आनंदी भावनांचेच प्रक्षेपण करणार आहेत.'(पृ.३५) सर्व स्त्रीपुरुषांना 'बोलण्याचा अधिकार नसला तरी ऐकण्याची मुभा मात्र आहे.'(पृ.३५) यापुढे फक्त मातृभाषेतच बोलण्याचे बंधन आले; जे दुसऱ्या भाषेत बोलतील त्यांच्या जिभा छाटल्या जातील असा इशाराही दिला गेला. माणसाचा याहून घोर अपमान तो काय असू शकतो? परंतु स्वत:चा चेहरा व ओळख हरवून बसलेल्यांना याहून वेगळी वागणूक तरी कशी मिळावी?

प्रतीक्षा या आदिबंधाची योजना करून कयामतच्या

दिवसाचे कल्पित कवीने प्रस्तुत कवितेत एखाद्या दुःस्वप्नासारखे मूर्त केले आहे. ''ही वेळ संक्रमणाची आहे नि कयामतचा दिवस जवळ आला आहे ...'' (पृ. १०५) असे जाहीर करून निवेदकाने भविष्यकालीन अकल्पनीय अरिष्टाचा भयकंपित ताण मूर्त केला आहे. ही कविता वाचताना 'वेटिंग फॉर गोदो' ची आठवण अपरिहार्यपणे येते. गोदो जरी प्रत्यक्ष रंगमंचावर येत नसला तरी नाटक मात्र त्यानेच व्यापलेले आहे. येथेही तृतीय पुरुष कवितेत साक्षात येत नाही, तरीही कविता मात्र तृतीय पुरुषाच्या आगमनाची आहे. त्याच्या प्रतीक्षेची आहे, त्याच्या आगमनाच्या संभाव्यतेमुळे, त्याच्या भयावह अस्तित्वाने सबंध कवितेला ग्रासले आहे दहशतीच्या रूपाने, त्याच्या पूर्वकालीन आक्रमक, हिंसक, अमानवी दुष्कर्मांच्या रूपाने.

वास्तवाला कल्पिताच्या अंगाने व्यक्त करण्याचे असाधारण सामर्थ्य मंगेश नारायणराव काळे यांनी या कवितेत अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केले आहे. भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. शब्दक्रीडा त्यांना सहजसाध्य आहे. पदांची, विधानांची आवृत्ती करण्याची त्यांची लकब दीर्घकवितेच्या सौष्ठवात भर घालणारी आहे. उपरोध व उपहास यांचा सातत्ययुक्त उपयोग करून ते अभिप्रेत आशयाला भरीवपणा आणतात. 'उधळलेला गुलाल', 'दुतर्फा पताका', 'अजागळ अंधार', 'आक्रोशाचे डांबर', 'अफवेचे गलिच्छ सांडपाणी', 'तर्काचे कडीकोयंडे', 'भाषेचे कुलूप' अशी अलंकारिक रचना त्यांना सहजसाध्य आहे. उपमा, रूपक, प्रतिमा, प्रतीके यांची सप्रयोजक योजना करून दीर्घकवितेच्या रूपात ते सौंदर्य निर्माण करतात. तृतीय पुरुषाच्या सर्वभक्षक रूपाची उभारणी करतानाच कवी व कविता यांची ताकदही त्यांनी निर्मिलेला निवेदक सुचवून जातो. निवेदन, कथन, नाट्य अशा लेखनरीतींचा अवलंब करून कवीने ही कविता रचली आहे. सतत उत्कंठा वाढत राहील, भावनात्मक ताण वाढत राहील, गूढता कायम राहील आणि पुरातन कालापासून वर्तमानाला साकार करीत भविष्यकालापर्यंतचा पल्ला सामावून घेतला जाईल अशा प्रकारे दीर्घकवितेचा हा रचनाबंध कवीने घडविला आहे. कवितेच्या शेवटी उपसंहारात जी प्राचीन संहिता कल्पिली आहे तीमुळे कवीने रचलेल्या प्रतीक्षानाट्याला– तृतीय पुरुषाच्या अस्तित्वाला व आगमनाला– दस्तऐवजाचा आधार प्राप्त होतो.

उपोद्घात, उपसंहार आणि सात प्रवेश अशी नऊ विभागांची मिळून झालेली ही मालाकविता एकसंध व एकरूप आहे. तथापि यातील प्रत्येक विभाग व विभागातील सुटे अंशदेखील स्वतंत्र कवितेच्या रूपाची क्षमता बाळगणारे आहे. समाजातील परस्परप्रेमाचा, सामंजस्याचा, संस्कृतीचा, मानवी मूल्यांचा जेव्हा ऱ्हास होऊ लागतो तेव्हा सृष्टीचा अंत समीप आला आहे हे ओळखावे, अशी समजूत सर्व धर्मांत आहे आणि तसे शास्त्राधार आहेत. वर्तमानस्थिती पाहाता माणसाची वाटचाल विनाशाकडे चालली आहे हे निःसंशय. स्वार्थाची, हिंसेची, परस्परद्वेषाची परमावधी झाली आहे. अशुभाचे व साशंकतेचे सावट सर्वत्र पसरले आहे. त्यामुळे आवश्यक तेव्हा तृतीय पुरुषाची प्रार्थना, आवश्यक तेव्हा त्याचे स्वागत, आवश्यक तेव्हा त्याचा गौरव, आवश्यक तेव्हा तडजोड, असे आवश्यकतेपोटी जे जे करावे लागेल ते ते करण्याची मानसिकता माणसाच्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे. कालशरणता, स्थितिशरणता, व्यक्तिशरणता एवंच, समग्र शरणागती हाच जीवनमार्ग ठरला आहे. संघर्षापेक्षा, लढ्यापेक्षा समझोता व तडजोड अटळ आहे. तृतीय पुरुष सर्वसमर्थ आणि उरलेले सारे दुबळे, हतवीर्य अशी परिस्थिती आहे. कवीच्या पातळीवर या सगळ्या परिस्थितीविषयीची प्रतिक्रिया फक्त शब्दांच्या माध्यमातूनच व्यक्त होऊ शकते. अभिधा, लक्षणा व व्यंजना या शब्दशक्तीच त्याची आयुधे आहेत आणि त्यांचा वापर कवीने तृतीय पुरुषाच्या आगमनाचा इशारा देण्यासाठी केला आहे. कादंबरीला साजेसा उपोद्घात व उपसंहार योजून नाटक आणि कादंबरी या लेखनप्रकारांची अर्थपूर्ण सांगड कवीने घातली आहे. या दीर्घकवितेतील प्रत्येक प्रवेश तृतीय पुरुषाचे भयावह अंतरंग सूचित करतो. ते सूचित करताना वर्तमानाची जाणीव होईल असे भूतकाळातील संदर्भ कवितेचा निवेदक एकामागून एक देत राहातो. पृथ्वीतलावर जन्माला येणाऱ्या प्रत्येकाचेच भूत, वर्तमान, भविष्य लिहून ठेवलेल्या संहितेचे देवर्षींनी सुरू केलेल्या वाचनाचे व श्रोत्यांवर होणाऱ्या परिणामाचे निवेदनातील चित्रदर्शित्व असाधारण आहे. 'मूर्तिमंत भीती उभी' असे त्या समयीचे वातावरण निवेदकाने मूर्त केले आहे. एकशेदहा पृष्ठांच्या या दीर्घकवितेला कवीनेच काढलेल्या चित्रांमुळे संपन्न अशी अर्थवत्ता लाभली आहे. व्यामिश्र आशयाला कवेत घेणारी दीर्घकविता लिहून मंगेश नारायणराव काळे यांनी मराठी कवितेच्या समृद्धीत चांगली भर घातली आहे. त्याबद्दल त्यांचे व 'अभिधानंतर' प्रकाशनाचे हेमंत दिवटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**विलास खोले**
गीतवसंत, प्लॉट नं. ३७, स्वेदगंगा हाऊसिंग
सोसायटी, वारजे, पुणे ४११०५८
दूरध्वनी : ०२०-२५२३ ४६४२